कृष्णा एक्सप्रेस
www.krishnaexpress.in
20 Sep 2026 - Page 3

# विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे धडे

## फसवणुकीचे प्रकार आणि बचावाच्या उपायांची माहिती

## आयटीआय कराडमध्ये सायबर जनजागृती सत्र



कराड : वाढत्या डिजिटल व्यवहारांसोबत ऑनलाइन फसवणूक आणि सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही वाढत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), कराड येथे सायबर जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.

या सत्रात सायबर योद्धा उझमा अजिम सुतार आणि प्रणव महादेव सटाले यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार, ऑनलाइन फसवणुकीच्या पद्धती आणि त्यापासून बचावासाठी घ्यावयाची खबरदारी याबाबत मार्गदर्शन केले. बनावट दूरध्वनी, फसव्या लिंक, ओटीपी फसवणूक, केवायसी अद्ययावत करण्याच्या नावाखाली होणारी फसवणूक, बनावट बँक संदेश, सामाजिक माध्यमांवरील फसवणूक, यूपीआय व्यवहारातील फसवणूक तसेच 'डिजिटल अटक' यांसारख्या प्रकारांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

सायबर गुन्हेगारांकडून भीती किंवा आमिष दाखवून नागरिकांची फसवणूक कशा प्रकारे केली जाते, हे प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट करण्यात आले. ओटीपी, यूपीआय पिन, एटीएम पिन, संकेतशब्द तसेच बँक खात्याशी संबंधित गोपनीय माहिती कोणाशीही सामायिक करू नये, अनोळखी लिंकवर क्लिक करू नये आणि संशयास्पद दूरध्वनी, संदेश किंवा ई-मेलला प्रतिसाद देऊ नये, असे आवाहन करण्यात आले. ऑनलाइन व्यवहार करण्यापूर्वी संबंधित व्यक्ती, संस्था किंवा संकेतस्थळाची खात्री करून घेण्याचा सल्लाही देण्यात आला.

सायबर फसवणूक झाल्यास वेळ न दवडता संबंधित बँकेशी संपर्क साधावा आणि राष्ट्रीय सायबर हेल्पलाइन क्रमांक १९३० वर तक्रार नोंदवावी, अशी माहितीही विद्यार्थ्यांना देण्यात आली. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथील सायबर शक्ती क्लबच्या वतीने कराड परिसरातील शाळा, महाविद्यालये तसेच विविध ठिकाणी सायबर जनजागृती कार्यशाळांचे आयोजन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांसह नागरिकांमध्ये वाढत्या सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि सुरक्षित डिजिटल व्यवहारांच्या सवयी रुजविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराडचे प्राचार्य डॉ. संजीव वाघ आणि 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' उपक्रमाच्या समन्वयक डॉ. प्रियांका शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमासाठी क्विक हील फाउंडेशनच्या सौ. अनुपमा काटकर, श्री. अजय शिर्के, श्री. दिपू सिंग आणि सौ. गायत्री केसकर यांचे सहकार्य लाभत आहे.

डिजिटल युगात तंत्रज्ञानाचा सुरक्षित आणि जबाबदारीने वापर करण्यासाठी सतर्क राहणे, संशयास्पद ऑनलाइन व्यवहार टाळणे आणि सायबर सुरक्षेच्या नियमांचे पालन करणे आवश्यक असल्याचा संदेश या जनजागृती सत्रातून देण्यात आला.